आजचा दिनविशेष

१९३१ : फ्रान्स आणि, सोव्हिएत युनियनने युद्धविरामावर स्वाक्षरी केली.

dainiklokaarambh@gmail.com

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २८ ऑगस्ट २०२५ | अंक २४८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



All TOURS SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007 घर से घर तक दिल से दिल तक Time in TRAVEL INDUSTRY www.suntourismpune.in

सन टुरिझम

प्रस्तुत करते

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :-


99222 22272 / 7602727555


# मनोज जरांगे पाटलांसोबत सरकारची चर्चा नाहीच?

# भगवे झेंडे, भगव्या टोप्या, शेकडो मराठ्यांत पाटील उभे

## मराठा बांधवांचा मोर्चा मुंबईच्या दिशेनं

29 ऑगस्टला मनोज जरांगे पाटील हे मुंबईतील आझाद मैदानात उपोषण करणार आहेत, या पार्श्वभूमीवर मराठा बांधवाचा मोर्चा अंतरवाली सराटीहून आज मुंबईच्या दिशेनं रवाना झाला आहे. या मोर्चाकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे. दरम्यान मनोज जरांगे पाटील यांना आझाद मैदान येथे आंदोलन करण्यास हाय कोर्टाकडून मनाई करण्यात आली होती, परंतु आता त्यांना एक दिवसांची परवानगी मिळाली आहे. आम्ही सरकारच्या सर्व अटींचं पालन करू मात्र उपोषण बेमुदतच करणार असं यावर प्रतिक्रिया देताना जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. 29 ऑगस्ट रोजी हा मोर्चा मुंबईमध्ये धडकणार आहे.



मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली आहे, त्यामुळे मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला आहे. मनोज जरांगे पाटील हे मुंबईच्या दिशेनं निघाले आहेत, ते 29 ऑगस्टाला मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलनाला सुरुवात करणार आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत लाखो मराठा बांधव देखील मुंबईच्या दिशेन निघाले आहेत. दरम्यान अशी बातमी समोर आली होती, की सरकारचं शिष्टमंडळ मनोज जरांगे पाटील यांची भेट घेणार आहे. या शिष्टमंडळात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि उदय सामंत यांचा सामवेश असणार आहे.पुढे ते असेही म्हणाले की, मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलनास परवानगी नाकारली जाते आणि नवी मुंबई खारघर इथे परवानगी दिली जाते. मग आझाद मैदानावर काय प्रॉब्लेम आहे? न्यायालयाचा सन्मान करणारे लोकं आहोत. कायद्याच्या नियमात राहून अर्ज करून परवानगी मागितली आहे. त्यामुळे शंभर टक्के आम्हाला न्यायालयाकडून परवानगी मिळणार, असा विश्वास जरांगे पाटलांनी व्यक्त केला. मात्र या संदर्भात बोलताना आता मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मोठा खुलासा केला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्याशी भेटीबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही. उदय सामंत आणि माझ्यातही त्याबाबत काही बोलणं झालेले नाही, असं यावेळी विखे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान चर्चा करण्यासाठी आंदोलनकर्त्यांची तयारी पाहिजे, त्यांची तयारी असेल तर आम्ही देखील तयार आहोत, मात्र त्यासाठी दोन्हीही बाजूने समन्वय झाला पाहिजे. उच्च न्यायालयाच्या निर्देशाबाबत जरांगे पाटलांनी निर्णय घ्यायचा आहे, शासनाची यात कुठलीही भूमिका नाही, सरकारने यापूर्वीही प्रतिष्ठेचा प्रश्न केलेला नव्हता आणि आताही नाही, असं विखे पाटील यांनी म्हटलं आहे.

# भारतावरील टॅरिफ हटणार? भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत बिग अपडेट

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भारतावर 50 टक्के कर लादला आहे. या कराची अंमलबजावणी आज (बुधवार) पासून झाली आहे. मात्र आगामी काळात हा कर कमी होण्याची शक्यता आहे. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारत आणि अमेरिकेतील व्यापाराबाबतची चर्चा अद्याप थांबलेली नाही. दोन्ही देशांमधील चर्चेचे दरवाजे खुले आहेत. त्यामुळे जर भविष्यात व्यापाराबाबत करार झाला तर भारतावरील कर कमी होऊ शकतो. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या दोन्ही देशांमध्ये तणावाची परिस्थिती असली तरी व्यापार चर्चेबाबत दोन्ही देशांकडून सकारात्मक संकेत मिळाले आहे. त्यामुळे ही चर्चा पुन्हा सुरु झाल्यास आणि तोडगा निघल्यास भारताला मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. कारण 50 टक्के करामुळे भारताच्या निर्यातीवर परिणाम होत



आहे, तसेच अमेरिकेत महागाई वाढण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे दोन्ही देशांवर सध्या संकट आलेले आहे. भारताची अमेरिकेसह इतरही देशांमध्ये निर्यातसूत्रांनी सांगितले की, भारताची निर्यात फक्त अमेरिकेवर अवलंबून नाही, त्यामुळे घाबरण्याची गरज नाही. भारत इतरही देशांसोबत व्यापार करत असल्याने मोठ्या संकटाची शक्यता कमी आहे. सध्या अमेरिकेने भारतावर कर लादला असला तरी भारत आणि अमेरिकेतील व्यापाराबाबतचा संवाद बंद झालेला नाही. याआधीही देशाला अनेक मोठ्या जागतिक आर्थिक धक्क्यांचा सामना करावा लागला होता, त्यामुळे भारत देश कराचा सामना करण्यासाठी सज्ज आहे.

# नऊ दिवस मृत्यूशी झुंज देत शिवम लगडे या विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू

शिवम च्या आईवर अजूनही उपचार चालू ..! आईच्या अनुपस्थितीत मुलाचा अंतिम संस्कार

देगलूर (प्रतिनिधी): तालुक्यातील कावळगाव येथील रहिवाशी व मानव्य विकास विद्यालय देगलूर मध्ये इयत्ता सहावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या शिवम बसवेश्वर लगडे (१२ वर्ष) याचा ९ दिवस मृत्यूशी झुंज देत काल मंगळवारी २६ ऑगस्ट रोजी त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. नांदेड च्या विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात त्याला १८ ऑगस्ट रोजी भर्ती करण्यात आले होते . १८ ऑगस्ट रोजी शिवम च्या आजोळी कारेगाव येथे असताना पहाटे ५.३० वाजता अंघोळीचे गरम पाणी त्याच्यावर व त्याच्या आईच्या अंगावर सांडले असता त्यात शिवम ८० % तर त्याची आई ४० % भाजली . लगेच त्या दोघांनाही खाजगी रुग्णालयात नेले असता गंभीर स्थिती असल्याने त्यांना नांदेड च्या विष्णुपुरी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सलग ९ दिवस मृत्यूशी झुंज देत अखेर शिवम ने शेवटचा श्वास घेतला. तर त्याच्या आईवर अजूनही उपचार चालू आहेत. आईवर उपचार चालू असल्याने शिवम च्या मृत्यूची बातमी न सांगता शिवम वर काल सायंकाळी कावळगाव येथे शेतात अंतिम संस्कार करण्यात आले. मानव्य विकास विद्यालयामध्ये श्रद्धांजली शिवम च्या निधनाची बातमी कळताच मानव्य विकास विद्यालयामध्ये दुपारी २.३० वाजता शिवम लगडे ला श्रद्धांजली अर्पित केली .

# अण्णा भाऊंच्या लेखणीने संविधानातील मूल्य जागृत केले- डॉ. अजय गव्हाणे




नांदेड अण्णाभाऊंना न्याय, समता व बंधुत्वावर दृढ विश्वास होता. त्यांनी आपल्या लेखणीतून संविधानातील मूल्ये जागृत करण्याचे कार्य केले. समाजातील गोरगरीब, उपेक्षित, वंचित व श्रमिक कष्टकरी यांचा आवाज त्यांनी आपल्या साहित्याद्वारे बुलंद केला. समानतेचे समाजस्वप्न त्यांनी पाहिले आणि आपल्या साहित्यकृतींमधून मांडले, असे प्रतिपादन प्रा. डॉ. अजय गव्हाणे यांनी केले. नायगाव येथे रविवारी साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष खासदार रवींद्र चव्हाण हे होते. प्रमुख अतिथी म्हणून कथाकार भारत दाढेल, रविंद्र भालेराव आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात मातंग समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा तसेच विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला प्राध्यापक डॉ. भगवान सूर्यवंशी, प्राध्यापक गडमवार आदी उपस्थित होते.

# 28 ऑगस्ट ते 3 सप्टेंबरदरम्यान मोठं संकट

मागच्या आठवड्यात झालेल्या पावसानंतर काही दिवसांच्या विश्रांतीनंतर आता परत एकदा भारतीय हवामान विभागाने मोठा इशारा दिलाय. थेट मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आलाय. यंदा राज्यात मॉन्सून लवकर दाखल झाला. सुरूवातीला सांगितले गेले की, ऑगस्ट महिन्यात पाऊस कमी असणार आहे. मात्र, प्रत्यक्षात जोरदार पाऊस होताना दिसतोय. आता गणपती आगमनानंतर पावसाचा जोर वाढताना दिसत आहे. आज भारतीय हवामान विभागाकडून मराठवाडा, कोकण, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्र पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यासोबतच सकाळीच मुंबईत जोरदार पावसाला सुरूवात झाली आहे. देशात पावसाचा जोर वाढताना दिसत आहे. छत्तीसगढ, आंध्रप्रदेश, गोवा, महाराष्ट्र, ओडिसा भागात जोरदार पाऊस होणार असल्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. यासोबतच आसाम, मेघालय, राजस्थान, गुजरात, हरियाणा, चंदीगढ, दिल्ली, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, पंजाब, तामिळनाडू या भागात पाऊस होईल. 28 ऑगस्ट ते 3 सप्टेंबरपर्यंत जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# अहिल्याबाई होळकर घरकुल योजना निधी मंजुर ..प्रा सापनकर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत आहे त्या अनुषंगाने बीड जिल्ह्यात 5700 मागच्या वर्षी घरकुलांना मंजुरी मिळाली होती बीड जिल्ह्यातील धनगर समाज या योजनेपासून वंचित असणाऱ्या अशा गोरगरीब लोकांसाठी फायदेशीर ठरणार आहे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना गेल्या अनेक दिवसापासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेच्या माध्यमातून



पाठपुरावा नेहमी करण्यात आला राष्ट्रीय समाज पक्ष तालुकाध्यक्ष प्राध्यापक सापनकर सर नेहमी मुंबई मंत्रालय स्तरावर व मंत्र्यांच्या भेटी घेऊन हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा हा पाठपुरावा केला आहे त्या पाठपुराव्याला यश आले आहे राहिलेल्या घरकुलाचा टप्पा लवकरच वितरित करण्यात येणार आहे आणि त्यांना हक्काचे आपलं घरकुल भेटणार आहे अशी आनंदाची भावना व्यक्त करताना समाज बांधव धनगर समाज वंचित उपेक्षित कष्टकरी भोळा भाबडा समाज आहे जर कोणत्या अधिकाऱ्याने पैशाची मागणी केली तर याद राखा असा इशारा देण्यात आला आहे प्रा सापनकर

# मराठा आरक्षणासाठी बेरळी बु येथील समाजबांधवांचे मुंबईकडे ट्रॅव्हल्सने प्रस्थान




मुखेड (प्रतिनिधी) मनोज जरांगे पाटील यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुखेड तालुक्यातील बेरळी बु गावातील समाजबांधवांनी मराठा आरक्षणाच्या मागणीला ठाम पाठिंबा दर्शविला आहे. दि.२७ ऑगस्ट रोजी सकाळी मोठ्या उत्साहात व दृढनिश्चयाने गावातील शेकडो नागरिकांनी मुंबईकडे प्रस्थान केले. गावकऱ्यांनी एकत्र जमून घोषणाबाजी करत मराठा समाजाच्या हक्काच्या मागणीला आवाज दिला. या प्रस्थानाने समाजातील ऐक्य आणि एकात्मतेची प्रचिती आली असून, आरक्षणाच्या लढ्याला नवे बळ मिळणार आहे. मुंबईकडे प्रस्थान करण्या अगोदर छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यात आले. स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले की, “मराठा समाजाला न्याय मिळाल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. मुंबईतील आंदोलनात सहभागी होऊन आपला आवाज बुलंद करण्यासाठी आम्ही जात आहोत.” बेरळी बु गावातून झालेले हे प्रस्थान मराठा आरक्षणाच्या राज्यव्यापी आंदोलनात महत्त्वाची ताकद ठरणार आहे

# हदगाव तालुक्यातील शेकडो मराठा सेवक मुंबईकडे रवाना

## एक मराठा लाख मराठा जय घोषाने गाव दनानले

हदगाव - प्रतिनिधी

मराठा योद्धा मनोज पाटील जरांगे यांच्या आदेशावरून २९ ऑगस्ट रोजी मुंबईत होणाऱ्या भव्य आंदोलनात सहभागी होण्यासाठी हदगाव तालुक्यातील शेकडो मराठा सेवक अंतरावली सराटीकडे रात्री पासून रवाना झाले आहे. हदगांव तालुक्यामध्ये मराठा समाज जास्त प्रमाणात असून प्रत्येक गावामधून चार ते पाच वाहनाचा ताफा निघालेला आहे. मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी पुकारलेल्या २९ ऑगस्ट रोजी आंदोलनाला जाण्यासाठी तालुक्यातील मराठा सेवकांनी चावडी बैठका घेऊन जनजागृती केली होती. त्यामुळे प्रत्येक घरातून एक व्यक्ती मुंबईकडे जाण्यासाठी तयार झाला असल्याने मोठ्या प्रमाणामध्ये मराठा सेवकांची गर्दी दिसून आली एक मराठा लाख मराठा यात जयघोषाने रात्रीच्या वेळी अख्खे गाव दणाणून गेले होते. काल मुंबई उच्च न्यायालयाने मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांना मराठा आरक्षण आंदोलनासाठी परवानगी नाकारली असल्याची चर्चा सुद्धा झाली होती. चर्चांना न जुमानता प्रत्येक



गावातून मराठा सेवक तयार झाला होता. घरची भाजी भाकरी राहण्याचे साहित्य वाहनामध्ये घेऊन मराठा सेवक अंतरावली कडे रवाना झाली. मराठा योद्धा मनोज पाटील जरांगे यांच्या ताफ्यामधून आज मुंबईकडे रवाना होणार आहेत. हदगाव तालुक्यातील हजारो मराठा सेवक मुंबईच्या दिशेने रवाना होत असल्याचे दिसून आले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २८ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### हार्ट अ‍ॅटॅकचा धोका टाळायचा असेल, तर आजपासूनच हे पदार्थ खाण्यास सुरुवात करा



आजच्या धावपळीच्या जीवनात हृदयाच्या समस्या वाढत आहेत आणि अनेक लोक त्यासाठी वेगवेगळे उपाय शोधत आहेत. पण तुम्हाला माहीत आहे का, तुमच्या हृदयाचे आरोग्य तुमच्या रोजच्या थाळीतूनच सुरू होते? जर तुमच्या आहारात योग्य पदार्थ असतील, तर तुमचे हृदय नक्कीच निरोगी राहू शकते. योग्य आणि पौष्टिक जेवण केवळ रक्तदाब नियंत्रित करत नाही, तर ते खराब कोलेस्ट्रॉल कमी करते आणि हृदयविकाराचा धोकाही खूप कमी करते. चला, आज आपण अशा काही पदार्थांबद्दल जाणून घेऊया, जे तुमच्या हृदयाला लोखंडासारखे मजबूत बनवतील. ब्लूबेरी, स्ट्रॉबेरी, सफरचंद आणि संत्री यांसारख्या फळांमध्ये भरपूर प्रमाणात अँटिऑक्सिडंट्स असतात. हे शरीरातील सूज आणि ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी करतात, ज्यामुळे हृदयविकारांचा धोका कमी होतो. संत्र्यात विरघळणारे फायबर आणि व्हिटॅमिन सी असते, जे खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते. तसेच, पालक, केल आणि ब्रोकोलीसारख्या हिरव्या भाज्यांमध्ये व्हिटॅमिन, मिनरल आणि नायट्रेट्स असतात, जे रक्तदाब कमी करून रक्तवाहिन्यांना निरोगी ठेवतात. 2. ओमेगा-३ युक्त पदार्थ

सॅल्मन, मॅकेरल, ट्राउट आणि सार्डिन यांसारख्या माशांमध्ये ओमेगा-3 फॅटी ॲसिड मोठ्या प्रमाणात आढळते. हे ट्रायग्लिसराइड्स कमी करते, सूज कमी करते आणि हृदयाची धडधड सामान्य ठेवण्यास मदत करते. जे लोक मासे खात नाहीत, त्यांनी चिया सीड्स आणि अळशीच्या बिया खाणे फायदेशीर आहे, कारण त्यातही ओमेगा-3 असते.

3. संपूर्ण धान्य

ब्राउन ब्रेड, ओट्स आणि दलिया यांसारखी संपूर्ण धान्ये हृदयासाठी खूप चांगली आहेत. या धान्यांमुळे रक्तदाब नियंत्रित राहतो आणि खराब कोलेस्ट्रॉल कमी होते. पांढरे तांदूळ आणि मैद्याऐवजी रोजच्या आहारात यांचा समावेश केल्यास हृदयाला खूप फायदा होतो.

4. आरोग्यदायी स्निग्ध पदार्थ

अक्रोड, बदाम, चिया सीड्स आणि अळशीच्या बियांसारख्या पदार्थांमध्ये आरोग्यदायी फॅट्स आणि फायबर असतात. हे कोलेस्ट्रॉल कमी करतात आणि वजन नियंत्रित ठेवण्यासही मदत करतात. तसेच, अ‍ॅव्होकाडो आणि ऑलिव्ह ऑइल मध्ये हृदयासाठी उपयुक्त फॅट्स आणि अँटिऑक्सिडंट्स असतात, जे शरीराला फिट ठेवतात.

5. दररोजची सवय

आपल्या रोजच्या आहारात हे पदार्थ समाविष्ट केल्यास तुमचे हृदय दीर्घकाळ निरोगी आणि मजबूत राहील. एका चांगल्या हृदयाची सुरुवात एका चांगल्या आहारानेच होते, हे नेहमी लक्षात ठेवा.

# "सहकार शाळेतील विद्यार्थ्यांनीकेला रानभाज्यांचा अनोखा उपक्रम"



ठाणे - 24सहकार विद्या प्रसारक मंडळ इंग्रजी माध्यमिक शाळेत रानभाज्यांचा उपक्रम उत्साहात पार पडला .या उपक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष डॉ. अमोल भानुशाली यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संस्थेच्या संचालक मंडळींच्या सहकार्याने करण्यात आले .या उपक्रमामागील प्रेरणा व संकल्पना इंग्रजी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. ज्योती सावंत यांची होती

विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जोशी -बेडेकर कला वाणिज्य जेष्ठ महाविद्यालयातील मराठी भाषा विभाग प्रमुख डॉ.संतोष लक्ष्मण राणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच प्रा. रुपेश यशवंत महाडिक आणि प्रा. राजश्री माने हे मराठी विभागातील शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेले मान्यवर ही उपस्थित होते. शाळेचे प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका, शिक्षक वृंद ,विद्यार्थी व पालक यांचा सहभाग या उपक्रमात होता.कार्यक्रमाचे परीक्षण म्हणून सौ. कल्पना सांगळे या उपस्थित होत्या .विद्यार्थ्यांनी पारंपारिक रानभाज्यांचे पदार्थ बनवून प्रदर्शन मांडले.'टाकळा,माठ शेवगा पाने ,अळू' यासारख्या रानभाज्यांचे नमुने दाखवून त्यांचा आरोग्यावर होणारा लाभ स्पष्ट करण्यात आला या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना निसर्गातील संपत्ती बद्दल आदर वाटला तसेच स्थानिक अन्न-संस्कृतीची जपणूक करण्याचे महत्त्वही समजले. पाहुण्यांनी व पालकांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. प्रमुख पाहुण्यांनी रानभाज्यांचे स्थानिक संस्कृतीतील महत्त्व अधोरेखित केले आणि विद्यार्थ्यांना आरोग्यदायी आहाराचा संदेश दिला. शेवटी कार्यक्रमाचे समारोप प्रास्ताविक व आभार प्रदर्शनाने झाला. रानभाज्यांचा हा उपक्रम शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमामध्ये एक वेगळा व प्रेरणादायी अनुभव ठरला. सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मुख्याद्यापकांच्या मार्गदर्शनाखाली रानभाज्यांचा अनोखा उपक्रम यशस्वी केला.

# ज्येष्ठ साहित्यिक तानाजी एकोंडे,साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे साहित्य पुरस्काराने सन्मानित

पुणे,२५ ऑगस्ट: कवी,लेखक,संपादक तानाजी एकोंडे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व कलारंजन सांस्कृतिक संस्था यांच्या संयुक्त सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.

चिंचवड येथील रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आयोजित साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सोहळ्यात साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या साहित्यिकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह,रोख रक्कम,ग्रंथ व शाल देऊन गौरविण्यात आले.त्यावेळी चाळीस वर्षपेक्षा अधिक काळापासून साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रात सेवा देणारे गुणवंत कामगार व कामगार शिक्षक तानाजी एकोंडे,यांना "साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे साहित्य पुरस्कार" प्राप्त झाला.

. तानाजी एकोंडे यांच्या लेखणीचा प्रवास महाविद्यालयीन शिक्षण घेत असल्यापासून सुरू झाला असून आजपर्यंत त्यांनी विविध मासिके,दिवाळी अंक आणि वृत्तपत्रातून विपुल लेखन केलेले आहे.दरम्यानच्या काळात त्यांना जपानमध्ये तांत्रिक प्रशिक्षण घेण्याचा योग आला आणि तेथे त्यांनी "उगवत्या सूर्याचा देश-जपान" हे नामांकित पुस्तक लिहिले.त्या पुस्तकाची दुसरी आवृत्तीही प्रकाशित झाली असून त्यास अनेक पारितोषिके आणि पुरस्कार




प्राप्त झाले.त्यानंतर त्यांचे साहित्य अधिक फुलत गेले.त्यांनी आतापर्यंत विविध विषयावर सहा-सात पुस्तकाचं लेखन केलेलं असून त्यांना शासनाचे आणि विविध संस्थांचे अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.त्यात दोन राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराचाही समावेश आहे.

एकोंडे यांना पर्यावरणाची आवड असून ते अनेक वर्षापासून पर्यावरण चळवळीत काम करतात. वृक्षारोपण,वृक्ष संवर्धन आणि भित्तीचित्राच्या माध्यमातून पर्यावरणाचे महत्त्व समाजापर्यंत पोचविण्याचे ते अविरत कार्य करत आहेत.त्यांना नुकतेच मिळालेल्या "पर्यावरण मित्र पुरस्कार" आणि "साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कारा" वरून त्यांच्या पर्यावरण क्षेत्रातील कार्याची आणि साहित्यिक वाटचालीची दिशा समजण्यास मदत होते.

खासदार मान.श्रीरंग बारणे, विधानपरिषद आमदार मान.उमाताई खापरे,कलारंग सांस्कृतिक प्रतिष्ठानचे संस्थापक आमदार मान.अमित गोरखे,माजी आमदार अश्विनीताई जगताप,अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर,माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त करून साहित्यिकांना गौरविले.

त्याप्रसंगी अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बाळासाहेब रसाळ,अनिल सौंदळे,प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे,नगरसेविका अनुराधा गोरखे,नगरसेवक शितल शिंदे,भाजपा महिला उपाध्यक्षा सुप्रिया चांदगुडे, नगरसेवक राजेंद्र बाबर, संदीप वाघेरे,अमित गावडे, कैलास कुटे,सुजाता पालांडे, जयश्री गावडे,वैशाली काळभोर,राजू दुर्गे, सामाजिक कार्यकर्ते मनोज सूर्यवंशी,हभप अशोक महाराज गोरे,साहित्य संवर्धन समितीचे अध्यक्ष सुरेश कंक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

निमंत्रक म्हणून आमदार अमित गोरखे यांनी सर्व साहित्यिकांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या .

खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले की, "अण्णाभाऊ साठे यांना "भारतरत्न" पुरस्कार मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केला जाईल."

अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या "द फोक परंपरा" या सांस्कृतिक भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. शाहिरी,पोवाडे,लोकगीते व लोकसंगीत या संगीतमय कार्यक्रमाचा आनंद सर्व रसिकांनी घेतला.

# 31 वर्षांच्या सेवेनंतर शिक्षिका असम्पशन रॉड्रिग्ज सेवानिवृत्त

गणेश हिरवेमुंबई प्रतिनिधी सेंट टेरेसा हायस्कूल वांद्रे मुंबई येथील शिक्षिका असम्पशन रॉड्रिग्ज या २६ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त झाल्या.त्या या शाळेत १९९४ रोजी दाखल झाल्या होत्या.एक कर्तव्यदक्ष आणि विद्यार्थीप्रिय शिक्षिका म्हणून सर्वजण त्यांना ओळखत होते.कार्यक्रमात शाळेतील शिक्षिकानी छान गीत गाऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. तर शाळेचे मुख्याध्यापक फादर शिनोय यांनी त्यांना शुभेच्छा देत त्यांच्याबद्दल गौरोदगार काढले.फादर यावेळी खूपच भावूक झाले होते.यावेळी शाळेचे विधार्थी, पालक, शिक्षक, यांनी देखील त्यांच्या आठवणी सांगत त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेचे मॅनेजर फादर हेत्री, ॲडमिनिस्ट्रेटिव फादर अक्षित, कौन्सेलर फादर जोस, शिक्षिका असम्पशन यांचे नातेवाईक उपस्थित होतें.मनोगत व्यक्त करताना असम्पशन




यांनी आपल्या आठवणी सांगून सर्व गोष्टींना उजाळा दिला तसेच शाळेतून निवृत्त होताना मन खूपच भरून आल्याचे सांगून शाळेची नेहमीच आठवण येत राहील असे नमूद केले.अनेक शिक्षक, विधार्थी यांनी शिक्षिका असम्पशन यांच्या आठवणी सांगितल्या.जॉय चे संस्थापक गणेश हिरवे यांनी देखील त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविले.सूत्रसंचालन शिक्षिका डायना मेनेझेस यांनी केले.

# कंत्राटी कर्मचाऱ्यांचे कामं आंदोलन

## आज जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार मोर्चा

नांदेडप्रतिनिधी:बालाजीसिरसाट

नांदेड : १९-ऑगस्ट पासून राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन.एच.एम) अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय उपजिल्हा रुग्णालय येथील सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन सुरू केले आहे. तर आज कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजनही केले आहे.हा धडक मोर्चा आयटीआय महात्मा फुले पुतळ्यापासून




निघून थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. आतापर्यंत १० वर्ष व त्या पेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांना शासन सेवेत सामावून घेण्यासाठी दिनांक १४- मार्च २०२४ रोजी शासन निर्णय घेण्यात आला पण त्याची अंमलबजावणी १८ महिन्याचा कालावधी उलटूनही होत नसल्यामुळे कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन पुकारले आहे. कोविड सारख्या महामारीमध्ये याच कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आपले व आपल्या कुटुंबाचे जीव धोक्यात घालून दिवस रात्र सेवा दिली. काहींना आपले जीव सुद्धा गमवावे लागले.पण तरी सुद्धा शासन या कर्मचाऱ्यांना तटपुंज्या मानधनावर राबवून घेत आहे. मानधन वाढ, बदली धोरण , विमा सुरक्षा ,मानधन निश्चिती ईपीएफ सारख्या कोणत्याच प्रकारच्या सुविधा मिळत नसल्याने या कर्मचाऱ्यांनी नाईलाजाने कामबंद आंदोलन सुरू केले आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या संदर्भात किनवट माहूर विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्यासाठी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना सकारात्मक पत्र लिहून या कामबंद आंदोलनास पाठिंबा दर्शविला आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २८ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## गणपती बाप्पाला आवडणाऱ्या दुर्वांचे 'हे' 5 आरोग्यदायी फायदे



संपुर्ण भारतात गणपती बाप्पाचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. आज अनेकांच्या घरी गणपती बाप्पा विराजमान झाले आहेत. त्यामुळे प्रत्येक घराघरात बाप्पाची पुजा केली जात आहे. अशातच बाप्पाला मोदक आणि लाडूंसोबतच दुर्वा देखील खूप आवडतो. हेच कारण आहे की त्यांच्या पूजेमध्ये दुर्वा आवर्जून अर्पण केले जाते, परंतु तुम्ही कधी विचार केला आहे का की बाप्पाला दुर्वा का अर्पण केला जातो आणि त्यामागील कथा काय आहे? तसेच तुम्हाला माहिती आहे का बाप्पाला अर्पण करण्यात येणारा दुर्वा आरोग्यासाठी किती फायदेशीर आहे? चला जाणून घेऊया त्यामागील मनोरंजक कहाणी आणि त्याचे 5 आश्चर्यकारक आरोग्यदायी फायदे.
पौराणिक कथेनुसार, प्राचीन काळी अनलासुर नावाचा एक राक्षस होता जो पृथ्वी आणि स्वर्ग दोन्ही ठिकाणी दहशत निर्माण करत होता. तर हा राक्षस ऋषी मुनी आणि सामान्य लोकांना खूप त्रास देत असायचा. जेव्हा सर्व देव अनलासुराने त्रासले तेव्हा त्यांनी विघ्नहर्ता गणपती बाप्पाकडे मदत मागितली. देवतांच्या विनंतीनंतर गणेशजींनी त्या अनलासुराला गिळून टाकले. राक्षस गिळल्यानंतर गणेशाच्या पोटात खूप जळजळ होऊ लागली. खूप प्रयत्न करूनही जळजळ कमी झाली नाही तेव्हा 88 सहस्त्र मुनींनी प्रत्येकी 21 अशा हिरव्यागार दुर्वांच्या जुड्या गणरायांच्या मस्तकांवर ठेवल्या आणि कश्यप ऋषींनी त्यांना दुर्वांच्या २१ जुड्या खायला दिल्या. गणेशाने दुर्वा खाल्ल्याबरोबर त्यांच्या पोटात जळजळ कमी झाली. यापुढे मला दुर्वा अर्पण करणाऱ्यास हजारो यज्ञ, व्रत, दान व तीर्थयात्रा केल्याचे पुण्य मिळेल, असे गणराय म्हणाले होते. तेव्हापासून दुर्वा गणेशाला खूप प्रिय झाला आणि त्यांच्या पूजेमध्ये दुर्वा अर्पण करण्याची परंपरा सुरू झाली. दुर्वाचे 5 आरोग्यदायी फायदे
दुर्वामध्ये अनेक औषधी गुणधर्म देखील आहेत, जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. आयुर्वेदात दुर्वा अमृताच्या समतुल्य मानले जाते. चला जाणून घेऊया त्याचे काही खास फायदे:
1. पचन सुधारते: जर तुम्हाला पचनाशी संबंधित समस्या असतील तर दुर्वाचा रस खूप फायदेशीर ठरू शकतो. यामुळे छातीत जळजळ, आम्लता आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या दूर होण्यास मदत होते.
2. रोगप्रतिकारक शक्ती वाढवते: दुर्वामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि दाहक-विरोधी गुणधर्म शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. याचे नियमित सेवन केल्याने अनेक प्रकारचे आजार टाळता येतात.
3. त्वचेसाठी फायदेशीर: दुर्वाची पेस्ट त्वचेवर लावल्याने खाज सुटणे, पुरळ येणे आणि त्वचेशी संबंधित इतर समस्या दूर होतात . तसेच दुर्वा त्वचेला थंड करते आणि पोषण देते.
4. रक्तातील साखर नियंत्रित करा: दुर्वापासून तयार केलेला रस रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतो. मधुमेहाच्या रुग्णांसाठी हा एक चांगला घरगुती उपाय आहे.
5. शरीराला थंडावा देते: आख्यायिकेत सांगितल्याप्रमाणे, दुर्वाचे सेवन केल्याने शरीरातील उष्णता कमी करण्यास मदत करते. त्यामुळे उन्हाळ्यात ज्या लोकांना उष्णतेचा खूप त्रास होतो, तसेच नाकातून रक्त येणे आणि पोटात जळजळ यासारख्या समस्यांना शांत करते.

# आरक्षणासाठी तालुका पेटला; गावागावातून 'चलो मुंबई'चा एल्गार!

नायगाव ( तालुका प्रतिनिधी), दि. २७ ऑगस्ट २५ : मराठा आरक्षणाच्या निर्णायक लढ्यासाठी संपूर्ण तालुका एकवटला असून, मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनात गावागावातून मराठा बांधवांचे जत्थे मुंबईच्या दिशेने रवाना होत आहेत. "मराठ्यांच्या लेकरांना आरक्षण मिळावे," हाच मुख्य उद्देश घेऊन आणि "आरक्षण भेटल्याशिवाय परत येणार नाही," असा पोलादी निश्चय करून हे कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले आहेत. तालुक्यातील देगाव, पळसगाव, ताकबिड, गंगनबिड, मरवाळी, खंडगाव अशा अनेक गावांतून मराठा समाजबांधवांनी आरक्षणाच्या लढाईत स्वतःला झोकून दिले आहे. प्रत्येक गावातून सुमारे २० ते २५ कार्यकर्त्यांचे गट, स्वयंपूर्ण तयारीने, अंतरवाली सराटीच्या मार्गाने मुंबईकडे कूच करत आहेत. या यंपूर्त आंदोलनामुळे संपूर्ण तालुक्यात एक अभूतपूर्व उत्साह आणि एकजुटीचे वातावरण निर्माण झाले आहे. देगाव गावातून दयानंद गणेश मोरे, व्यंकट मोरे, रामदास पुयड श्री मोरे, संजय मोरे, छत्रपती मोरे, गजानन मोरे, सुभाष मोरे, योगेश मोरे, विनायक मोरे, आनंद मोरे, दत्ता मोरे



यांच्या नेतृत्वात सुमारे २० जणांचा गट मुंबईला रवाना झाला. या गटाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची आत्मनिर्भरता. त्यांनी केवळ प्रवासाचेच नव्हे, तर मुंबईतील मुक्कामासाठी लागणारे गॅस, तांदूळ, गव्हाचे पीठ आणि इतर जेवणाचे संपूर्ण साहित्य सोबत घेतले आहे. प्रशासनावर कोणताही भार न टाकता, शांततेच्या मार्गाने हक्क मिळेपर्यंत लढण्याचा त्यांचा निर्धार आहे. गावातून निघताना 'एक मराठा, लाख मराठा' आणि 'चलो मुंबई'च्या घोषणांनी आसमंत दणाणून गेला होता. त्यांच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास आणि समाजासाठी काहीतरी करण्याची तळमळ या लढ्याच्या यशाची ग्वाही देत होती. तालुक्यातील या गावागावातून निघालेले हे जत्थे मराठा समाजाच्या एकजुटीचे आणि आरक्षणाच्या मागणीसाठी असलेल्या तीव्र भावनेचे प्रतीक बनले आहेत.

# शामला पंडित (दीक्षित) साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे साहित्य पुरस्काराने सन्मानित

पुणे,२५ ऑगस्ट २०२५ - कवयित्री,लेखिका, अध्यापिका,शामलाक्षरी काव्य निर्मितीच्या उद्गात्या व प्रकाशिका शामला पंडित (दीक्षित)यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका व कलारंजन सांस्कृतिक संस्था आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.

चिंचवड येथील रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आयोजित साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सोहळ्यात साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या साहित्यिकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह,रोख रक्कम,ग्रंथ व शाल देऊन गौरविण्यात आले.काव्य प्रकारात नवनवीन प्रयोग करणाऱ्या आणि ज्यांच्या नावावर १६ काव्यसंग्रह आणि एक कथासंग्रह प्रसिद्ध आहेत,अशा कवयित्री शामला पंडित (दीक्षित ) यांना "साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे साहित्य पुरस्कार" प्राप्त झाला.त्यांनी प्रणाली प्रकाशनच्या माध्यमातून चाळीसपेक्षा अधिक साहित्यिकांची पुस्तके प्रकाशित केलेली आहेत.त्यांनी "शामलाक्षरी " (समान शब्द, अर्थ भिन्न )असलेल्या नवकाव्य प्रकाराची



देणगी मराठी साहित्याला दिली आहे. "शामलाक्षरी " हा काव्य प्रकार साहित्यिकात रूढ झाला असून शामलाक्षरी काव्य प्रकारात पाच प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहे. अध्यापिका म्हणून शालेय स्तरावर नाट्यसंहिता लेखन , दिग्दर्शन त्यांनी केल आहे .सकाळ नाट्यवाचन स्पर्धेत अनेक वेळा यश संपादन केले आहे .पिंपरी चिंचवडचा आदर्श शिक्षक पुरस्कार ,मुंबई व धुळे येथील साहित्यरत्न पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत .

खासदार मा.श्रीरंग बारणे,विधानपरिषद आमदार मान.उमाताई खापरे,कलारंग सांस्कृतिक प्रतिष्ठानचे संस्थापक आमदार मान.अमित गोरखे,माजी आमदार अश्विनीताई जगताप,अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर,माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त करून साहित्यिकांना गौरविले.

त्याप्रसंगी अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बाळासाहेब रसाळ, अनिल सौंदळे,प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, नगरसेविका अनुराधा गोरखे, नगरसेवक शितल शिंदे, भाजपा महिला उपाध्यक्ष सुप्रिया चांदगुडे,नगरसेवक राजेंद्र बाबर,संदीप वाघेरे, अमित गावडे,कैलास कुटे,सुजाता पालांडे,जयश्री गावडे, वैशाली काळभोर, राजू दुर्गे, सामाजिक कार्यकर्ते मनोज सूर्यवंशी, हभप अशोक महाराज गोरे, साहित्य संवर्धन समितीचे अध्यक्ष सुरेश कंक आदी मान्यवर उपस्थित होते.

निमंत्रक म्हणून आमदार अमित गोरखे यांनी साहित्यिकांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले की,"अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केला जाईल." "द फोक परंपरा" या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमातून सादर केलेल्या शाहिरी,पोवाडे,लोकगीते व लोकसंगीत या संगीतमय कार्यक्रमाचा आनंद उपस्थित रसिकांनी घेतला.

# वाढदिवस व सत्कार समारंभ

समाजसेवक मा.सागर अशोक गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन विकास मंदिर मतीमंद मुलांची शाळा , मुक्तीधाम मंदिर मागे , दत्तमंदिर रोड नासिकरोड येथे करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व सत्कार मुर्ती डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र शासन समाजभूषण मा सुभाषजी पोपटराव बोराडे यांनी भुषविले तर कार्यक्रमाचे उद्घाटन माजी नगरसेवक मा. आर,डी, धोंगडे व बडेबॉय समाजसेवक मा. सागर गायकवाड , संविधान कराओके ग्रृपचे संस्थापक राजन गायकवाड व मान्यवरांच्या यांच्या हस्ते दिप प्रज्वोलीत करून कार्यक्रमाची सुरुवात केली तर संविधान कराओके ग्रृप संस्थापक अध्यक्ष मा.राजन गायकवाड सर व त्यांच्या ग्रृपचे बौध्द वंदना घेऊन महापूरुषाना वदन करून कार्यक्रम सुरवात झाली , यावेळी विकलांग शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गायले यानतर शाळेच्या संस्थापक अध्यक्षा मा.सुहासनी घोडके मॅडम यांनी शाळेच्या वतीने मनोगत व्यक्त केले व सांगितले फक्त चार मुलांच्या वरीत चाळीस वर्षांपूर्वी या शाळेचे रोपटे लावले व आज तिनशे विद्यार्थीच्या माध्यमातून वटवृक्ष झाला आहे पण मिळालेला लोक समाजसेवेचा निधी खुपच कमी असल्याने या मुलांना साभाळणे कढीण जात आहे तरी या शाळेसाठी दानशुरानी मदतीचा हात. पुढे करावा असे मनोगत व्यक्त केले तर माजी नगरसेवक मा रमेश आर,डी, धोंगडे यांनी सांगितले आम्ही शाळेला सतत सहकार्य करीत असतो यापुढेही करीत रहाणार यानतर प्रमुख मान्यवर व कार्यक्रमाचे अध्यक्ष समाज भुषण मा.सुभाष पोपटराव बोराडे यांना नुकताच महाराष्ट्र शासनाचा डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार मिळाल्याबद्दल ,सागर गायकवाड परिवार व शाळेच्या वतीने स्मृती चिन्ह,शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तर कार्यक्रमाचे उद्घाटन मा.नगरसेवक आर डी धोंगडे यांचा सत्कार करण्यात आला यावेळी व्यासपीठावर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला यावेळी सागर गायकवाड या परिवाराने कोणताही अनाठायी खर्च न करता आपला वाढदिवस या शाळेत केक कापुन आलेल्या प्रमुख अतिथीचे शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व शाळेतील विद्यार्थ्यांना गोड जेवणाची मेजवानी दिली. या ठिकाणी संविधान कराओके ग्रृप चे संस्थापक राजन गायकवाड सर यांच्या ग्रृप तर्फे सदाबहार गाणी व लावणी नृत्य सादर केले कार्यक्रमाला मतीमंद व विकलग मुलांनी गाणी गाऊन नाच केला यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ,सिएनपी नेटप्रेस माजी अधिकारी मा.मनोज चिमनकर, शिवसेना नेते गणेश कदम ,पी एस आय मनतोडे साहेब राष्ट्रवादी कॉंग्रेस नेते अशोक मोगल , सचिन आहेर,तसेच शाम शिंदे, संतोष गाडेकर, अश्विन पवार, प्रविण भालेराव,दिपक गायकवाड,किरण भालेराव, कुंदन व करूणा निरभवणे ,सह संविधान करोओके संस्थापक राजन गायकवाड सह प्रेम सागर , संजय देशपांडे,अनिल कुमार साबळे, उत्तम जाधव , वनिता आहेर, मिना पाठक ,नंदिनी जाधव , कमल वटाणे,तर लावणी नृत्य खास निफाडचा लावणी ठसका स्हेनल भालेराव यांनी सादर केला कार्यक्रमाचे अध्यक्ष समाज भुषण बोराडे यांनी सांगितले शाळेसाठी लागणा-या अनुदान साठी लवकरच राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा.संजयजी शिरसाठ साहेब, सामाजिक न्याय केंद्रिय मंत्री ना.रामदासजी आठवले साहेब व रिपाई नासिक जिल्हा प्रमुख व उतर महाराष्ट्र अध्यक्ष मा प्रकाशजी लोंढे सह अनेक मान्यवराच्या मदतीने शासनाकडे पाठपुरावा करून शाळेला जास्तीत जास्त निधी मिळवून देण्यासाठी आपण सर्व प्रर्यत्न करु,व समाजातील राजकीय वैद्यकीय शौक्षणीक कला क्रीडा सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीनानी असा ठिकाणी आपले वाढदिवस साजरे करा त्यामुळे शाळेतील गोर, गरिब, निराधार, बेघर,अंध , अपंग,विकलंग,मतीमंद मुला- मुलींना आपल्या कडुन मिळणाऱ्या विविध वस्तु , अन्नदान, लाभ होईल व त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद दुगुना होईल आज सागर गायकवाड यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते .

# आरक्षण घेतल्याशिवाय आता परतणार नाही मराठा सेवकांचा निर्धार

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे दर्शन घेऊन नांदेड येथून हजारो मराठे निघाले मुंबईच्या दिशेने

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्ट रोजी मुंबई आझाद मैदान येथे आमरण उपोषण आंदोलनाचे जाहीर केले होते, त्यानुसार त्यांनी महाराष्ट्रातील सर्व समाज बांधवांना दि.२६-ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी या ठिकाणी मुक्कामासाठी बोलवले होते.२७-ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता अंतरवाली येथून मनोज जरांगे पाटील समाज बांधवांसह मुंबईच्या दिशेने निघणार होते, त्याच अनुषंगाने पूर्ण मराठवाड्यात गेले दोन महिने झाले मराठा सेवकांनी वाड्या–तांडे अक्षरशः झोडपून काढले.मराठा समाजाची आरक्षणाची मागणी कशी रास्ता आहे, ओबीसी मध्ये मराठा



समाजाला आरक्षण का हव आहे, मराठा समाजाची खालवलेली परिस्थिती, विद्यार्थ्यांची दशा सर्वच गोष्टी या विचार करायला भाग पाडणाऱ्या नक्कीच आहेत. मराठा समाज आज घडीला हतबल झाला असून मराठा समाजाची आर्थिक विवंचना दूर करायचे असेल सरकारी नोकऱ्यांमध्ये मराठा समाजातील तरुण दिसला पाहिजे यासाठी सर्व गरजवंत मराठा मनोज जरांगे पाटील यांच्या मागे खंबीर उभा आहे याची प्रचिती अनेक वेळा होताना दिसत आहे.मनोज जरांगे पाटील यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात चावडी बैठकांची आयोजन मराठा सेवकांनी केले प्रतिसाद ही उस्फूर्त भेटला. मराठा आरक्षणासाठी मराठ्यांनी आता चंग बांधले असून मराठा आरक्षण घेऊनच परत येणार असा निर्धार दि.२७-ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटीच्या दिशेने निघालेल्या मराठा सेवकांनी केला.छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्याचे दर्शन घेऊन नांदेड जिल्ह्यातील किनवट माहूर लोहा कंधार देगलूर मुखेड भोकर हदगाव हिमायतनगर अर्धापूर मुदखेड उमरी नायगाव धर्माबाद तालुक्यातील लाखो समाज बांधव मुंबईच्या दिशेने रोजच्या जीवनावश्यक वस्तूंसह रवाना झाले आहेत.गणेश चतुर्थीचा सण असतानाही एवढ्या मोठ्या प्रमाणात नांदेड जिल्ह्यातील मराठा सेवकांना अंतरवालीची आस लागली होती. विघ्नहर्ता गणराया मराठा आरक्षणातले सगळे विघ्न दूर करो ही प्रांजळ प्रार्थना करून यंदाचे गणपती विसर्जन अरबी समुद्रात करण्याचा मानस मराठा सेवकांनी केला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २८ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून खासदार फौजिया खान यांचे सूचना व पत्रांना बगल

## वक्फ मंडळाचे कारभारावर वरिष्ठ सदस्य खासदार फौजिया खान नाराज

### एक वर्षापासून बैठकीस अन उपस्थिती, मंडळाविरुद्ध मंत्रालयात तक्रार पण, राज्यसभेत मुद्दा सादर होणार असल्याची चर्चा

सी.एस.नगर ( एकीकडे राज्यात वक्फ मंडळाच्या कामकाजात सुधारणा होत असल्याचा डंका पिटला जात असताना दुसरीकडे याच मंडळाचे वाभाडे काढणारे कोणी बाहेरचे नसून मंडळाचेच वरिष्ठ सदस्य असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. हे सदस्य म्हणजे राज्यसभा खासदार डॉ. फौजिया खान. गेल्या एक वर्षापासून फौजिया मॅडम मंडळाच्या बैठकींना हजेरी लावत नाहीत, एवढेच नव्हे तर त्यांनी थेट मंत्रालय, राज्यपाल, अगदी पीएमओ ऑफिसपर्यंत तक्रारींचा पाऊस पाडला आहे. मंडळाच्या कारभारातील बेजबाबदारपणा,



नियमभंग आणि दुर्लक्ष याविरोधात त्यांनी तब्बल दहा पेक्षा जास्त पत्रे पाठवली असल्याची माहिती समोर आली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे—नियमावलीनुसार वक्फ मंडळाच्या अध्यक्षपदाला खासदार-आमदारांना प्राथमिकता देण्याची अट



असूनही, राजकीय खेडी करून हे पद इतरांना देण्यात आले. त्यामुळेच वरिष्ठ सदस्य असूनही फौजिया मॅडम यांना डावलण्यात आले. या निर्णयामुळे त्यांची नाराजी स्वाभाविक मानली जात आहे. मात्र, त्यांच्या नाराजीवर पांघरूण घालण्याऐवजी मंडळाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जुनेद सय्यद यांनी त्यांना सातत्याने दुर्लक्षित केले. फौजिया मॅडम यांचे नाराजीचे कारण असे आहेत की त्यांनी अनेक महत्त्वाच्या प्रकरणांवर सूचना केल्या, पत्रे दिली, परंतु त्यावर कारवाई न करता मंडळाने व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मनमानीपणे काम केले. नांदेड जिल्ह्यातील बिलोली शहरातील ऐतिहासिक सरफराज मस्जिद प्रकरण हे त्यातीलच एक उदाहरण आहे. या प्रकरणात भूमाफियांचे संरक्षण

दैनिक लोक आरंभ मिळालेल्या दोन महत्त्वाच्या पत्रांच्या प्रती पुराव्यादाखल उपलब्ध असून, यात मंडळाच्या ढिसाळ कारभाराचा व भूमाफियांना मिळणाऱ्या संरक्षणाचा ठोस उल्लेख आहे. वरिष्ठ सदस्यांची नाराजी, त्यावरील मंडळाचे दुर्लक्ष आणि त्यातून बाहेर पडणारे घोटाळे — या सगळ्यामुळे वक्फ मंडळाच्या कामकाजावर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले असून, “कुठे ना कुठे पाणी मुरत आहे” हे आता स्पष्ट होत चालले आहे.

होत असल्याचे आणि मंडळाकडून जाणीवपूर्वक दिरंगाई होत असल्याचे आरोप त्यांनी पत्रव्यवहारातून केले आहेत. आता सर्वात मोठा धक्का म्हणजे—फौजिया मॅडम राज्यसभेत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचा मुद्दा उपस्थित करणार असल्याची माहिती मिळाली आहे. जर तसे झाले, तर फक्त राज्यातच नव्हे तर देशभरात महाराष्ट्र वक्फ मंडळाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे राहील. परिणामी अध्यक्ष, सदस्य आणि सीईओ जुनेद सय्यद यांच्यासमोर गंभीर अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

# इमरान शाह यांच्याकडून लॅपटॉप व शैक्षणिक साहित्याचे वाटप



हजरत शाहिनशा वली (रह.) यांच्या विचारसरणीला अनुसरून लॅपटॉप व शैक्षणिक साहित्याचे वाटप

बीड (लोक इच्छा न्युज):- बीड जिल्ह्याच्या पावन भूमीत अनेक औलिया-ए-किराम, सूफी संतांनी आपल्या खऱ्या इस्लामी तालीम, इबादत आणि आध्यात्मिक कार्यांनी जनतेला मार्गदर्शन केले आहे. त्यापैकी एक प्रख्यात नाव म्हणजे हजरत शाहिनशा वली (रह.) ऊर्फ कोचक शाह हे एक होते. हजरत कोचक शाह वली (रह.) हे लोकांच्या हृदयातील दुःखं, वेदना कमी करून त्यांना अल्लाहकडे झुकवणारे एक महान सूफी संत होते. त्यांचा जीवनप्रवास अत्यंत साधा, पण लोकांना शिकवणारा आणि समाजाला एकत्र आणणारा होता. हजरत शाहिनशा वली (रह.) ऊर्फ कोचक शाह यांच्या मानवतेची सेवा, ज्ञानाचा प्रसार आणि बंधुभावाचा संदेश याला अनुसरून सामाजिक कार्यकर्ते इमरान गफ्फार शाह यांनी एक स्तुत्य उपक्रम राबविला. दारुल उलूम इमामे रब्बानी येथे इमरान शाह यांच्या हस्ते शैक्षणीक शिक्षण घेण्याबरोबरच धार्मीक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लॅपटॉप व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षण क्षेत्रात मागे राहू नये, या उद्देशाने ही मदत करण्यात आली. इमरान शाह हे बीड जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात. गरजूंसाठी मदतकार्य, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप तसेच सामाजिक ऐक्य प्रस्थापित करण्यासाठी ते सतत कार्यरत आहेत. या वेळी उपस्थितांना संबोधित करताना इमरान शाह म्हणाले की, हजरत शाहिनशा वली (रह.) यांनी दिलेल्या विचारसरणीप्रमाणे समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण व मार्गदर्शनाची संधी मिळाली पाहिजे. ज्ञानाचा प्रसार करूनच समाज प्रगती करू शकतो. कार्यक्रमास दारुल उलूमचे प्रमुख हजरत मौलाना मुफ्ती महोम्मद अन्वर नोमानी साहब, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते इमरान शाह, महोम्मद पठाण, शेख बशीर, रेहान बागवान, अरफात शेख सह आदि उपस्थित होते.

## परंपरेचा थाट आणि उत्साहाचा जल्लोष; नायगाव तालुक्यात गणेश चतुर्थी साजरी



नायगाव विघ्नहर्त्या गणरायाच्या आगमनाचा उत्साह नायगाव तालुक्यात सर्वत्र दिसून येत आहे. तालुक्यातील देगावसह अनेक गावांमध्ये आज पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या जल्लोषात गणेश चतुर्थीचा सण साजरा करण्यात आला. तरुणांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांनी एकत्र येत ‘मंगलमूर्ती मोरया’चा जयघोष करत बाप्पांना घरी आणलेदेगावमध्ये घरोघरी बाप्पा विराजमान झाले असून, गावातील वातावरण चैतन्याने भारले आहे. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या कुटुंबांनी वाजतगाजत बाप्पांचे स्वागत केले. घरात सुंदर रांगोळ्या, सजावट आणि पूजा-विधी यांनी मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे. गणेशोत्सवामुळे गावातील सामाजिक सलोखा अधिक घट्ट होत असून, हा सण केवळ धार्मिकच नव्हे, तर एक सामाजिक उत्सव बनला आहे. या उत्सवाच्या माध्यमातून गावातील एकोपा आणि संस्कृतीचे दर्शन घडत आहे.

## प्रा.डॉ. लतीफ खान यांचे मिलिया एच एस सी व्होकेशनल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन संपन्न



मिलिया एचएससी व्होकेशनल कनिष्ठ महाविद्यालय बीड येथील इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी या व्यवसाय अभ्यासक्रमाचा माजी विद्यार्थी आणि सध्या माजलगाव येथे सुंदरराव सोळुंके महाविद्यालयामध्ये प्राध्यापक असलेले डॉक्टर लतीफ खान यांनी मिलिया एचएससी व्होकेशनल कनिष्ठ विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाचे महत्त्व ,रोजगार व स्वयंरोजगार संधी या विषयावर सखोल असे मार्गदर्शन केले.

यावेळी महाविद्यालयातील विविध व्यवसाय अभ्यासक्रमांचे विद्यार्थी शिक्षक प्राध्यापक उपस्थित होते.

# जिल्हा अधिकारी साहेब, बॅनर व प्रिंट वाल्यांची ‘मस्ती’ जिरवाच – बॅनर नियम आणा, बॅनरमुक्त जिल्हा करा : शेख युनूस

बीड :बीड जिल्ह्यात बॅनरबाजीमुळे वाद, भांडण व गोंधळाच्या घटना सातत्याने घडत असून नागरिक त्रस्त झाले आहेत. नुकत्याच गेवराई तालुक्यात बॅनरवरून दोन गटांमध्ये भांडण झाल्याची घटना घडली. सध्या शहरांमध्ये महापुरुषांच्या नावाखाली तसेच भावी नगराध्यक्ष, भावी नगरसेवक या नावाने मोठमोठे बॅनर व होर्डिंग्ज लावले जात आहेत. हे बॅनर नगरपरिषदेची परवानगी न घेता, अनेकदा सार्वजनिक ठिकाणी



नियमबाह्य पद्धतीने लावले जात असल्याचे स्पष्ट दिसते. यामुळे रस्त्यांवर गर्दी निर्माण होऊन वाहतुकीला अडथळा निर्माण होतो, तसेच छोटे-मोठे अपघात घडण्याची शक्यता वाढते. मर्यादेपेक्षा अधिक आकाराचे बॅनर लावल्यामुळे शहरांचे सौंदर्य विद्रूप होत आहे. नागरिकांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत असून, सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमणासारखीच बॅनरबाजीची समस्या गंभीर होत आहे. नागरिकांच्या भावना व्यक्त करताना शेख युनूस यांनी सांगितले की, “बीड जिल्हा बॅनरमुक्त करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कठोर नियम लागू करावेत. वाढदिवस अथवा राजकीय कार्यक्रमाच्या नावाखाली सुरू असलेली बॅनरबाजी थांबवून परवानगीशिवाय लावलेल्या बॅनरवर दंडात्मक कारवाई केली पाहिजे.” नागरिकांचीही अपेक्षा आहे की जिल्हा प्रशासनाने लवकरच पावले उचलून बीड जिल्ह्याला ‘बॅनरमुक्त जिल्हा’ घोषित करावे.

# तहसीलदार शेळके यांनी शहेनशाहवली दर्ग्यास भेट देऊन केली चादर अर्पण

बीड (प्रतिनिधी)-बीड शहरातील प्राचीन व धार्मिक दृष्ट्या अत्यंत महत्वपूर्ण हजरत शहेनशाहवली यांच्या दर्ग्यात सध्या भव्य उर्स व संदल सोहळा साजरा होत आहे . या निमित्ताने बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मंगळवार 26 ऑगस्ट रोजी दर्ग्यात भेट देऊन चादर अर्पण केली.या वेळी दर्गा समितीचे मान्यवर , मुजावर व स्थानिक नागरिक उपस्थित होते . भाविकांच्या उपस्थितीत तहसीलदार शेळके यांनी दर्ग्यातील धार्मिक विधींमध्ये सहभाग घेतला. दर्गा समितीने व मुजावर यांनी त्यांचे स्वागत करून या ऐतिहासिक सोहळ्याची महती अधोरेखित केली. यावेळी त्यांचा सत्कार शेख अझहर आणि अझीम भाई यांनी केला. यावेळी हजरत शहेनशाहवली हजरत शहेनशाहवली कोण होते याची माहिती घेतांना हे 14व्या शतकातील चिश्तिया मजहबातील एक प्रख्यात सूफी संत होते . ते शेख बुरहानुद्दीन गरीब चिश्ती ( खुलदाबाद ) यांचे शिष्य होते . मुहम्मद तुघलक यांच्या राज्यकाळात ते बीडमध्ये आले आणि येथेच त्यांनी आपले वास्तव्य केले . त्यांच्या अध्यात्मिक प्रभावामुळे आणि जीवनातील साधेपणामुळे स्थानिक जनतेत त्यांच्याबद्दल अपार श्रद्धा निर्माण झाली . बीड शहराच्या पूर्वेकडील उंच भागात त्यांची समाधी असून , 1385 पासून 1840 पर्यंत विविध काळात या दर्ग्यावर बांधकाम झाले . हजरत शहेनशाह चौकी - आख्यायिका व श्रद्धा : दर्ग्याच्या परिसरातील चौकी हे धार्मिक व ऐतिहासिक दृष्ट्या पूजनीय स्थान आहे . लोकमान्यतेनुसार , येथेच हजरत शहेनशाहवली ध्यान-तपश्चर्या करत असत. असे सांगितले जाते की त्यांनी या चौकीवर उभे राहून प्रथमच बीडकडे पाहिले आणि यही मेरी रहगुज़र और मेरी मंज़िल होगी असे उद्गार काढले. भाविकांचा विश्वास आहे की चौकीवर प्रार्थना केली की संकटे दूर होतात आणि मनोकामना पूर्ण होतात. आजही उर्सच्या काळात चौकी फुलांनी , दिव्यांनी आणि चादरींनी सजवली जाते व भाविक तिथे डोकं टेकवून दुवा (प्रार्थना) करतात . कव्वाल मंडळींच्या सूरांनी वातावरण भारून जातं . मन कुन्तो मौला , फा अलीयुन मौला सारख्या पारंपरिक कव्वालींचे स्वर दर्ग्याच्या प्रांगणात दुमदुमतात . तसेच काही खास



शेरही भाविकांच्या मनाला स्पर्शून जातात -
दरगाह-ए-शहनशाह में बरकत ही बरकत है,
हर दिल को यहाँ सुकून-ए-रहमत है।
जो आया दर पर तेरे, खाली न गया कभी,
तेरा करम है साईं, सब पे मेहरबाँ सदा।

सांप्रदायिक ऐक्याचे प्रतीक : शहेनशाहवली दर्गा हा केवळ मुस्लिम भाविकांचाच नाही तर हिंदू समाजाचाही श्रद्धास्थान आहे . उर्स काळात दोन्ही समाजातील लोक मोठ्या संख्येने येथे येऊन सहभाग घेतात . त्यामुळे हा दर्गा बंधुता , एकात्मता आणि सौहार्दाचे प्रतीक मानला जातो . या संदल सोहळ्याच्या निमित्ताने बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी उपस्थित राहून चादर अर्पण केली त्यांच्या या उपस्थितीने धार्मिक परंपरेला व हिंदु मुस्लीम एकतेला एक निरोप समाजाला मिळाला असून स्थानिक जनतेमध्ये आनंद व समाधान व्यक्त झाले .

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com